निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २०३ वा.
शुक्रवार - २६ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## बँकांनी सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्राला अर्थसहाय्य करावे - केंद्रीय गृह मंत्री अमित शाह

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** ज्या देशामध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र पूर्णपणे प्रगत झाले आहे. तोच देश जगात विकसित राष्ट्र म्हणून उदयास आला आहे. भारतालाही २०४७ पर्यंत सर्वच क्षेत्रात विकसित राष्ट्र बनविण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला बळकट करावे लागणार आहे. त्यासाठी बँकांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना अर्थसहाय्य करावे, असे आवाहन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.



इंडियन एक्सप्रेस माध्यम समूहाच्यावतीने हॉटेल आयटीसी ग्रँड सेंट्रल येथे आयोजित 'इंडियाज बेस्ट बँक्स' पुरस्कार वितरण सोहळा झाला. त्यावेळी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, इंडियन एक्सप्रेस माध्यम समूहाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक गोयंका, संपादक श्यामल मुजुमदार, कार्यकारी संपादक ऋषीराज उपस्थित होते.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, भारताच्या बँकिंग क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने अनेक धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. याच सुधारणांचा परिपाक म्हणून भारताचा विकासदर सहा ते सात टक्के ठेवण्यात यश आले आहे. देशामध्ये थेट परकीय गुंतवणुकीमध्ये ४० टक्क्यांनी वाढ नोंदविण्यात आली आहे. जग विकसित आणि विकसनशील अशा दोन भागात विभागले आहे. विकसित देश त्यांच्या अस्तित्वासाठी आणि विकसनशील देश कर्जाने ग्रासले आहेत. मात्र भारत कल्याणकारी योजना, वित्तीय सुधारणा आणि खंबीर नेतृत्वामुळे विकासाची गाथा पुढे नेत आहे.

मागील दहा वर्षात ५६ कोटी बँक खाती उघडण्यात आली आहेत. यामुळे ४४ लाख कोटी रुपयांचे विविध योजनांच्या लाभाचे वितरण थेट बँक खात्यात करण्यात येत आहे. प्रत्येक गावात आणि गावातील प्रत्येकापर्यंत बँक जोडण्यात आली आहे. बँकांवरील कर्जाचा भार कमी करून एनपीए (नॉन परफॉर्मिंग असेट्स) २.५ टक्के ठेवण्यात यश आले आहे. बँकिंग तंत्रज्ञान सुधारण्यासाठी चार 'आर' वर काम करण्यात आले आहे. यामध्य रिकनाईझ, रिकव्हर, रिकॅपॅबिलिटीज आणि रिफॉर्म यांचा समावेश आहे, असेही केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले, बँकांनी मागील काळात झालेल्या वित्तीय सुधारणांचा अभ्यास करून शासनाला भविष्यातही काही सुधारणा करावयाच्या असल्यास त्या सुचवाव्यात. नुकत्याच केंद्र शासनाने वस्तू व सेवा कर (जीएसटी) मध्ये सुधारणा केल्या आहेत. कुठल्याही विक्री करामध्ये आतापर्यंतची ही सर्वात मोठी कपात आहे. वित्तीय विषयक गुन्ह्यांमध्ये दंड अधिक करण्यात आला आहे. तसेच कायद्यांमध्ये बदल करून बँकिंग सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करण्यात आल्या आहेत .

देशात डिजिटल उत्क्रांती होत आहे. प्रति सेकंद ५ हजार ८०० पेक्षा जास्त डिजिटल व्यवहार भारतात होत आहे. जगातील सात देशांनी युपीआयला मान्यता दिली आहेत. डिजिटल क्रांतीमध्ये डिजी लॉकरचाही मोठा वाटा आहे. देशात ५२ कोटी पेक्षा जास्त नागरिक डिजी लॉकरचा उपयोग करीत आहे. देशात दोन लाख १८ हजार गावांमध्ये भारत नेटच्या माध्यमातून इंटरनेटची सुविधा देण्यात आली आहे. भारत हा स्टार्टअपमध्ये जगामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. देशात १.९२ लाख स्टार्टअप सुरू झाले आहेत. बँकिंग क्षेत्राने आता आपल्या व्यापकतेकडे लक्ष द्यावे.

जगातील पहिल्या दहा बँकांमध्ये भारताच्या बँकेचे नाव असावे, अशी अपेक्षाही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केली.यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची फायनान्शिअल एक्सप्रेसचे संपादक श्यामल मुजुमदार आणि कार्यकारी संपादक ऋतुराज यांनी मुलाखत घेतली. मान्यवरांच्या हस्ते बँकिंग क्षेत्रातील विविध पुरस्कारांचे वितरण यावेळी करण्यात आले. जीवन गौरव पुरस्कार फेडरल बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक श्याम श्रीनिवासन यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला बँकिंग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## पळसवाडी मधील दलित वस्तीतील रस्त्याचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटवले

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/**खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी येथील गट क्रमांक १८९ मधील समाजमंदिर कॉलनीकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यावर अनेक वर्षां पासून अतिक्रमण झाले होते. लॉकडाऊनपासून या रस्त्यासह गावातील रस्त्यांवर स्थानिक नागरिक माधव दिगंबर जगताप यांनी अतिक्रमण करून रस्ते बंद केले होते.या मुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अखेर तहसीलदारांच्या आदेशानुसार सोमवारी पोलीस बंदोबस्तात हे अतिक्रमण हटवण्यात आले.

**दिलासा व आनंदाचे वातावरण**

गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्यासाठी संघर्ष करणाऱ्या गावकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. रस्ता मोकळा झाल्यामुळे संपूर्ण पळसवाडी गावात आनंदाचे वातावरण आहे.



**उपसरपंचांचा उपोषण संघर्षाला आले यश**

गावातील नागरिकांना ये-जा करण्यास मार्ग नसल्याने उपसरपंच सोमीनाथ ठेंगडे यांनी सहा महिन्यांपूर्वी खुलताबाद तहसील कार्यालयासमोर उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. दोन दिवस चाललेल्या या उपोषणानंतर तहसीलदार स्वरूप कंकाळ पळसवाडी येथे दाखल झाले होते. त्यांनी घटनास्थळी पंचनामा करून रस्ता मोकळा करण्याचे आश्वासन दिले होते. त्याच आश्वासनाच्या आधारे उपोषण मागे घेण्यात आले होते.अखेर दिलेला शब्द पाळला.तहसीलदारांनी दिलेला शब्द पाळत सोमवारी सकाळी पळसवाडी येथे ग्रामसेवकांच्या नियोजनाखाली व पोलीस बंदोबस्तात रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यात आले.रस्ता पूर्णपणे मोकळा झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**ग्रामस्थांची प्रतिक्रिया**

या कारवाईनंतर गावातील नागरिकांनी, आम्हाला रस्ता मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्याच अडचणी दूर झाल्या आहेत. यापुढे शाळकरी मुले, लहान थोर गावकरी सुरक्षितपणे मार्गाने जाऊ शकतील, अशी भावना व्यक्त केली. तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व तहसीलदार स्वरूप कंकाळ यांचे आभार मानले.

## सोयगाव तालुक्यातील त्या ढगफुटी सदृश्य पाऊस झालेल्या गावांची पालकमंत्री संजय शिरसाठ यांची पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/ प्रतिनिधी/** ढगफुटी सदृश्य पावसाने नुकसान झालेल्या बोरमाळतांडा,नांदगाव तांडा,घोसला, तिडका, निमखेडी या गावातील झालेल्या शेतीसह पिकांच्या नुकसानी ची गुरुवारी सायंकाळी सहा वाजता पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्यासह कन्नड-सोयगावच्या आमदार संजना जाधव यांच्यासह जिल्हा यंत्रणेच्या पथकांनी गावांची रात्री सात वाजेपर्यंत पाहणी केली यावेळी पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी बोरमाळ तांडा,तिडका, नांदगाव तांडा,घोसला आणि निमखेडी या ढगफुटी बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून तुम्ही डगमगू नका,सरकार तुमच्या पाठीशी आहे.



त्यामुळे भरीव मदत देण्यात येईल त्यामुळे या संकटातून सावरून घ्या असे समजावून सांगितले दरम्यान यावेळी त्यांनी घोसला येथील खटकाळी नाल्याच्या पुराने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून मदतीची चिंता करू नका असे स्पष्ट शब्दात सांगितले यावेळी खटकाळी नदीच्या तीरावर महिला,ग्रामस्थांच्या पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी व्यथा समजून घेतल्या होत्या,यावेळी पथकात भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष ईदरिस मुलतानी, जिल्हा सचिव सुनील गव्हांडे, तालुका सरचिटणीस राहुल राठोड, आदी उपस्थित होते यावेळी बोरमाळ तांड्याचे सरपंच सदाशिव राठोड, भाजपचे जिल्हा चिटणीस भगवान पवार,राजू राठोड, यांनी गावात झालेल्या नुकसानी बाबत पालकमंत्री संजय शिरसाठ यांना माहिती दिली यावेळी पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी या सहा गावांसह तालुक्यातील बाधित क्षेत्रात पंचनामे हाती घेण्यात येईल व शेतकऱ्यांना तातडीने भरीव मदत देऊ असे आश्वासन दिले यावेळी नितीन बोरसे,निलेश मगर,ईश्वर सपकाळ,आदींची उपस्थिती होती.

## ३ ऑक्टोबर रोजी बंजारा समाजाचा मोर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी /** खुलताबाद तालुक्यातील बंजारा समाजाच्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी एसटी प्रवर्गातील आरक्षणासाठी निघणार आहे अखिल भारतीय बंजारा आरक्षण समिती वतीने देण्यात आलेले निवेदनावर शेकडो समाज बांधवांचे स्वाक्षऱ्या होते.विशेष म्हणजे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी हैद्राबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर आता बंजारा समाज एसटी प्रवर्गातील आरक्षणासाठी आक्रमक झाला आहे.

३ ऑक्टोबर रोजी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे हैद्राबाद गॅझेटमध्ये बंजारा समाज एसटी प्रवर्गात होता.त्यामुळे मराठा समाजाला हे गॅझेट लागू होत असेल तर ते बंजारा समाजाला ही लागू झाले पाहिजे व एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळाले पाहिजे, असे दिलेले निवेदनावर नमूद केले आहे. खुलताबाद तालुक्यातील बंजारा समाजाच्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे असे निवेदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे.बंजारा समाजाला हैदराबाद इस्टेट गॅजेट १९२० नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण द्यावे.

खुलताबाद अखिल भारतीय बंजारा आरक्षण समिती तर्फे दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता सकल बंजारा समाजाचा भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्च्यास परवानगी तसेच योग्य ती सुरक्षा व्यवस्था मिळावी, यासाठी तहसीलदार स्वरूप कंकाळ व पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांना गुरुवारी (ता.२५) लेखी निवेदन




देण्यात आले आहे.मोर्चाची सुरुवात बाजार समिती पासून होऊन, बाजार चौक व आंबेडकर चौक मार्गे तहसील कार्यालय येथे होणार आहे. विशेष म्हणजे या मोर्चेमध्ये महिला मंडळी सह युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग अपेक्षित असून, शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा पार पडणार आहे. मोर्चाचे या मोर्चाची सांगता तहसील कार्यालयासमोर सभा स्वरूपात होणार असून, यासाठी व्यासपीठ व मंडपाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

बंजारा समाजाला हैदराबाद इस्टेट गॅजेट १९२० नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण द्यावे, या प्रमुख मागणीसाठी हा मोर्चा आयोजित करण्यात येत असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

या मोर्चाची पार्श्वभूमीवर कोणतेही अनुचित प्रकार घडू नाही दरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पुरेसा पोलिस बंदोबस्त ठेवावा, अशी ही मागणी केली आहे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आलेले निवेदनावर वसत राठोड, बाबराव पवार, अविनाश राठोड, रोहित राठोड रुपेश जाधव, सुनील चव्हाण,धामणगावचे माजी सरपंच विजय प्रल्हाद चव्हाण,संदीप चव्हाण, धनराज राठोड, मच्छिंद्र जाधव,ाजू राठोड, संतोष राठोड, सुदाम आडे,रावसाहेब जाधव,विशाल राठोड, मोहन लाला पराठो,किसन राठोड, मदन राठोड जीवन चव्हाण,वाल्मीक चव्हाण, सुरेश राठोड, अविनाश चव्हाण, देवा चव्हाण, गोरख राठोड ,लखन चव्हाण, लक्ष्मण जाधव, कुलदीप चव्हाण, दादाराव राठोड, प्रेम राठोड, विठ्ठल जाधव,सागर राठोड़, लक्ष्मण राठोड, विकास चव्हाण, रामचंद्र राठोड, संदीप राठोड, ज्ञानेश्वर राठोड व करण राठोड यांचे स्वाक्षऱ्या होते..

## संक्षिप्त



कुकडगाव येथील पिकाची पाहणी करताना भाजपाचे तालुका अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य मनोज काका पाटील शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पाहणी केली व शासन दरबारी पाठपुरावा करून मदत मिळून देवु व सिंदफणा नदीला माहापुर आल्याने शेतातील पूर्ण पीक गेले लवकर सरकार मायबाप मदत जाहीर करा हीच सरकार मायबाप कडे शेतकरी वर्गातून मागणी व गावातील शेतकरी रामनाथ बापु शिंदे इब्राहिम भाई सय्यद ग्रामपंचाय.

### केज येथे आर.पी.आय.(आंबेडकर) पक्षाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन




आत्ताच एक्सप्रेस

केज/प्रतिनिधी/रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या राष्ट्रीय पक्षाचे केज येथील तालुका संपर्क कार्यालयाचे उद्घाटन दि.२५ रोजी करण्यात आले.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे राष्ट्रीय नेते ड.दीपक भाऊ निकाळजे असून हा पक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतला आहे.

केज येथील तालुका संपर्क कार्यालयाचे उद्घाटन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा)वायबसे यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या महिला मराठवाडा अध्यक्ष आम्रपाली गजेशिव,पक्षाचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जाधव, केज तालुका अध्यक्ष अश्रूबा (दादा) खरात,तालुका संघटक नवनाथ सोनवणे,समाधान खरात,समाधान मस्के,ड सोनवने,लक्ष्मण सोनवणे,तरनळी येथील उपसरपंच शिवाजी मोहिते,आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोहरा येथील कुटुंबाचे कर्तव्य व्यतिरिक्त पर्यावरण सेवा संतोष शिंदे मुख्याध्यापक



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी /** कन्नड तालुक्यातील मोहरा येथील मुख्याध्यापक व समाजसेवक अशी ओळख असलेले संतोष शंकर शिंदे मुख्याध्यापक हे आपल्या कर्तव्य व्यतिरिक्त शाळेच्या सुट्टी च्या वेळा मध्ये पर्यावरणाच्या समृद्धीमध्ये भर पडावी यासाठी गेल्या पंधरा-वीस वर्षापासून स्वखर्चातून लोकसहभागातून तर कधी श्रमदानातून वृक्षारोपण करणे वृक्षारोपण केलेल्या झाडांना अळी करणे पाणी देणे छाटणी करणे असे निस्वार्थ कार्य पर्यावरणाचे करत आहे. त्यांनी गावातील सार्वजनिक ठिकाणी, गाव परिसर, गावामध्ये संतोषी माता मंदिर परिसरात, भवानी माता मंदिर परिसरात, माध्यमिक शाळा परिसरात, स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण केले आहे फक्त वृक्षारोपण केले नाही तर लावलेल्या झाडांचे संगोपन केले आहे. शेकडो फुलझाडे फळझाडे वनस्पती त्यांनी लावले आहे. या वृक्षारोपणामुळे गावातील सार्वजनिक ठिकाणी आज शोभा वाढली आहे. त्यांचे वडील स्वर्गवासी सैनिक दगडू शंकर शिंदे नायब सुभेदार यांच्या प्रेरणेतून त्यांनी हे समाजकार्य हाती घेतले आहे. अनेक लढाया मध्ये त्यांच्या वडिलांचा सहभाग होता. त्यांच्या वडिलांनी देश सेवा करून गावांमध्ये मोठे योगदान दिले आहे. एवढेच नाही तर गरजवंतांना विविध स्वरूपाची मदत देखील मुख्याध्यापक संतोष शिंदे हे नेहमी देत असतात. आज सर्वत्र पाऊस आणि कहर केला आहे कारण निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. प्रत्येकाने पर्यावरणाचे संरक्षण करणे गरजेचे आहे असे देखील मत त्यांनी व्यक्त केले. पुढील पिढीच्या आयुष्यासाठी नैसर्गिक वातावरण सुंदर असणे अतिशय गरजेचे आहे तरच ते दीर्घायुष्य जगेल. जीवनामध्ये काम करण्याची क्षमता आहे तोपर्यंत जमेल तेवढे पर्यावरणासाठी व गरजवंतासाठी निस्वार्थ काम करण्यामध्ये खूप आनंदा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या निस्वार्थ कामाचे समस्त गाव पंचक्रोशीत नेहमी कौतुक होत असते.

# पर्यटन; सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ

जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन २७ सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्र्व शांतीचा दुत आहे. पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते. त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात. कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत. पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टनयेथील हाऊदी मोदीकार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.

# सदाबहार अभिनेते ; देव आनंद

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०२ वि जयंती. १०२ वर्षांपुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची खुशवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नोकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही.

लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली. प्रभात कंपनीच्या हम एक है या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे काही चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे नवकेतनचा अफसर हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. अपना भी टाइम आयेगा.... असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत त्यांनी अभिनय केलेला बाजी हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले. बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. केसांचा तुरा, गुलछबू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले. त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुष्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर , तेरे घर के सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिप, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे त्यांचे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले. १९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसमोर त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील त्रिदेव असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेड्या झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून पळून मुंबईला येत असत. त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकुट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला. तू कहा ये बता, देखो रुठो ना करो, एक घर बनाएंगे तेरे घर के सामने, दिल का भवर करे रे पुकार, गाता रहे मेरा दिल, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, चुडी नही मेरा दिल दिल है दिल, फुलो का तारों का सबका कहना है, दिन ढल जाये, छोड दो आंचल जमाना क्या कहेगा यासारखी त्यांची असंख्य गाणी आजही लोकप्रिय आहेत. आजही ही गाणी आवर्जुन ऐकली जातात.

देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गँगस्टर, मै सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच्चे का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकार कडूनही त्यांना मानाचा पद्मभूषण पुरस्कार मिळाला. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला. ३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०२ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## संक्षिप्त

### ..त्या भ्याड हल्ला झालेल्या पवन करवर यांची माजलगाव समता परिषद कार्यकर्त्यांनी घेतली भेट



**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव/ प्रतिनिधी/** लक्ष्मण हाके यांचे विश्वासू पवन करवर हे माजलगाव येथील सावरगाव फाट्यावरील हॉटेलमध्ये जेवण करत असताना काही अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर भ्याड हल्ला केला त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले त्यांना परभणी येथील परभणी आशुव हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले भयभीत झालेल्या पवन करवर व त्यांच्या कुटुंबीयांना माजलगाव येथील समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी भेट घेऊन धीर दिला यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ऍड. सुभाष राऊत यांना फोन करून पवन करवर व त्यांच्या कुटुंबीयांना सर्व समता सैनिक आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील आश्वासनही समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ऍड. सुभाष राऊत यांनी दूरध्वनीवरून दिले यावेळी माजलगाव समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन खेत्रे, संतोष रासवे आनंत आढाव मछिंद्र आढाव अशोक रासवे यांच्या माजलगाव तालुक्यातील बहुतांश समता परीषदेचे पदअधिकारी उपस्थीत होते.

# दलितांना स्वतंत्र मतदारसंघ द्या !

**'पुणे करार धिक्कार परिषदे'तून बसपाचा ऐल्गार**

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/ प्रतिनिधी/** दलित समाजावर ९ दशकांपूर्वी झालेला अन्यायकारक भूतकाळ पुसून टाकण्याची वेळ आली आहे. 'पुणे करार'तुन बहुजनांचे राजकीय प्रतिनिधित्व 'राखीव मतदार'संघापूरते मर्यादीत ठेवण्यात आले. पंरतु, आता दलितांसाठी 'स्वतंत्र मतदारसंघ' देवून मोहनदास करमचंद गांधी आणि काँग्रेसने मुद्दाम केलेली चूक दुरूस्त करावा, अशी मागणी बहुजन समाज पक्षाच्या वतीने आयोजित 'पुणे करार धिक्कार परिषदे'त एकसुरात करण्यात आली.

बुधवारी (ता.२४) येरवड्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, महाराष्ट्राचे केंद्रीय समन्वयक,माजी खासदार राजाराम साहेब, प्रदेशाध्यक्ष ऍड.सुनिल डोंगरे, प्रदेश प्रभारी रामचंद्र जाधव, प्रदेश महासचिव डॉ.हुलगेश चलवादी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. पुणे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड यांनी परिषदेचे सूत्रसंचलन केले.

दलित, शोषित, उपेक्षितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी विश्वरत्न डॉ. आंबेडकरांनी दिलेला लढा सर्वश्रुत आहे. बाबासाहेबांनी गोलमेज परिषदेत इंग्रजांशी संघर्ष आणि बौद्धिक युक्तिवाद करून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ मंजूर करून घेत 'द्वीमतदानाचा' अधिकार मिळवून दिला होता. कायदेमंडळ, विधीमंडळात दलित समाजाच्या हिताचे कार्य करणारे, खरे प्रतिनिधी स्वतंत्र मतदार संघामुळे त्यामुळे निवडून जाणारे होते.परंतु, काँग्रेस व गांधींना अस्पृशांना मिळालेला स्वतंत्र मतदार संघाचा अधिकार मान्य नव्हता.दलित विरोधी मानसिकतेतून गांधींनी येरवडा कारागृहात उपोषण सुरू केल्यानंतर देशहित लक्षात घेता बाबासाहेबांनी पुणे करारावर स्वाक्षरी केली. हाच 'पुणे करार' दलितांच्या अधिकारांवर घाव ठरला,असे प्रतिपादन मा.राजाराम यांनी केले.

महामानव डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत असलेली 'शासनकर्ती जमात' होण्यासाठी बहुजनांना एकाच निळ्या झेंड्याखाली एकत्रित यावे लागेल.

'हत्ती' निवडणुक चिन्ह असलेल्या बसपच्या निळ्या झेंड्याखालीच बहुजन चळवळीला सुगीचे दिवस आले.याच झेंड्याखाली बहुजन समाजकारणासाठी सत्तारुढ होवू शकतो, असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष ऍड.सुनिल डोंगरे यांनी केले.

**दलितांना न्याय्य हक्कापासून गांधींनी वंचित ठेवले!**

पुणे करार करून गांधीनी दलितांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण केल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. गांधींचे आमरण उपोषण म्हणजे दलितांना त्याच्या न्याय्य हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी केलेले एक नाटक होते असे डॉ.बाबासाहेब म्हणाले होते, याची प्रचिती आज पदोपदी येते. गांधीच्या दलित विरोधी मानसिकतेतूनच काँग्रेस आणि इतर राजकीय पक्षांनी दलितांचे शोषण केले.आता बीएसपी ला राजकीय बळ देऊन या मानसिकतेला धडा शिकवण्याची वेळ आली आहे,असे आवाहन प्रदेश महासचिव डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले.

## खुलताबाद शहरात पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद शहरात भारतीय



जनता पार्टीचे आद्य स्थापक नेते आणि जनसंघाचे अग्रगण्य नेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि. २५) खुलताबाद पंचायत समिती कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. जयंती कार्यक्रम उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात भाजपचे तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,शहराध्यक्ष परसराम बारगळ, तालुका सरचिटणीा सतीश दांडेकर,माजी उप सभापती दिनेश अंभोरे, अविनाश कुलकर्णी, दिनेश कायस्थ, अरुण पाटील, राजेंद्र बढे, माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, अशोक तुपे, शंकर अंभोरे, रावसाहेब देशमुख, अंकुश काळे, सुरेश मालोदे, आजिनाथ बारगळ, ज्ञानेश्वर बारगळ यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमात महिला मंडळाच्या सदस्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. याप्रसंगी दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांवर प्रकाश टाकला गेला आणि उपस्थित कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात पंडित दिनदयाळ उपाध्याय जयंती साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची १०९ वी जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठ मुख्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. समाजातील शेवटच्या घटकाचा उत्कर्ष व्हावा असा अंत्योदय विचार पंडित दिनदयाळ उपाध्याय यांनी सातत्याने मांडला असे मा. कुलगुरू यांनी आपल्या भाषणात सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय हे आधुनिक भारतातील एकात्मक मानव दर्शन तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते असल्याचे सांगितले. तत्पूर्वी कार्यक्रमाच्या प्रारंभी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी वित्त अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ.गोविंद कतलाकुटे,परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र प्रमुख डॉ. दयाराम पवार, सेवासुविधा प्रमुख सुनील निकम यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन किशोर शिंदे यांनी केले.

# उपासना ही तत्वाची व्हावी..!

दैवी शक्ती म्हणजे ईश्वरी सामर्थ्य किंवा उच्च शक्तीची कृपा, जी सामान्यतः एखाद्या व्यक्तीच्या कल्पनेच्याही पलीकडे असते. ही शक्ती जगाला नियंत्रित करणा-या उच्च शक्तींकडून येते आणि पूर्वनियोजित घटना घडवते. अनेकदा असे मानले जाते की, जेव्हा एखादी व्यक्ती संकटातून अनपेक्षितपणे बाहेर पडते किंवा जीवनात काही अलौकिक घटना घडतात, तेव्हा ती दैवी शक्तीमुळे घडते, असे लोकं मानतात.

थोडक्यात, दैवी शक्ती म्हणजे एका अज्ञात आणि शक्तिशाली अस्तित्त्वाची कृपा, जी आपल्या जीवनावर आणि घटनांवर प्रभाव टाकते. असे अनेक धर्मांमध्ये आणि अध्यात्मात मानले जाते. ही शक्ती देव किंवा एखाद्या उच्च शक्तीशी संबंधित आहे आणि त्या शक्तीचा प्रभाव दर्शवते. दैवी शक्ती नैसर्गिक नियम आणि मानवी बुद्धीच्या पलीकडे कार्य करते, ज्यामुळे अनपेक्षित गोष्टी घडतात. ही संकल्पना अध्यात्मिक आणि धार्मिक विचारांशी जोडलेली आहे, जिथे ईश्वर आणि त्याच्या शक्तीवर विश्वास ठेवला जातो. या शक्तीमुळे जीवनातील घटनांवर परिणाम होतो आणि ती व्यक्तीला संकटातून बाहेर काढण्यास मदत करते, असे मानले जाते.

ही दैवी शक्ती साक्षात स्त्रीशक्ती आहे. देवीचे पूजन करणे म्हणजे स्त्रीतत्त्वाची पूजा करण्यासारखेच आहे. कारण स्त्री ही आई, बहीण, मुलगी आणि पत्नी अशा सर्व भूमिका पार पाडणारी शक्ती आहे. त्यामुळे, दैवी शक्ती आणि स्त्रीशक्ती एकच आहेत आणि या उत्सवाचा उद्देश मातृशक्तीचा गौरव करणे आहे. नवरात्रोत्सव हा देवीच्या पूजनाचा सोहळा आहे आणि देवीला स्त्रीशक्तीचे प्रतीक मानले जाते.

देवी ही केवळ एक स्त्री नाही, तर ती सर्व नाती जपणारी आणि सृजन करणारी शक्ती आहे, असे मानले जाते. जिथे नारीची पूजा होते, तिथे प्रत्यक्ष भगवंतांचा वास असतो असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की, स्त्रीशक्तीची पूजा केल्याने आपोआपच सर्व देवतांचे सान्निध्य प्राप्त होते. नवरात्र हा मातृशक्तीचा उत्सव आहे, जो स्त्रीच्या सृजनशक्तीचाही उत्सव आहे. त्यामुळे, नवरात्रीत आपण दैवी शक्ती आणि समस्त नारीशक्ती या दोन्हीचा उत्सव साजरा करतो, कारण त्या एकच आहेत.

पण कोणतीही लिंग विशिष्ट पूजा आली की तिथे अहंकार येतोच आणि अहंकार आला की उपासना संपते. त्यामुळे पूजा, उपासना, साधना ही तत्वाची व्हावी, व्यक्तीची नव्हे. कारण व्यक्तींमध्ये दोष असतातच. तत्व शुद्ध, निर्लेप आणि निरपेक्ष असते. अर्थातच देवी ही शक्तीरूपच असते. पुरुष देवता या त्या विशिष्ट क्रियेचं ती क्रिया कशी व्हावी हे ज्ञान असतात, तर स्त्री देवता म्हणजे त्यांच्या ज्या पत्नी दाखवलेल्या असतात त्या ती ती विशिष्ट क्रिया पार पाडणारी शक्ती असतात. ज्ञान आणि कृती किंवा क्रिया यांचा संगम झाल्यावरच अर्थात घडल्यावरच कार्य घडते. नवरात्रीला स्त्री शक्तीचा जागर म्हणायचं असेल तर गणेश उत्सवाला, कृष्ण जन्माष्टमीला पुरुष शक्तीचा जागर म्हणायचं का? शिव शब्दात शिव हा शब्द शव या पुरुष रुपाला इ हा स्त्री लिंगी स्वर जोडून शिव हा शब्द बनला आहे. हा इ हा स्त्री उच्चारी स्वर नसेल तर शिव हे फक्त शव म्हणजेच प्रेत होईल.

लक्ष्मी ही विष्णूची शक्ती आहे जिला आपण विष्णूची पत्नी म्हणतो. सरस्वती ही ब्रह्मदेवाची कार्यकारी शक्ती म्हणजे सृष्टी कशी बनवायची हे ज्ञान ब्रह्मदेव आणि ती प्रत्यक्ष बनवण्याची शक्ती म्हणजे सरस्वती. ब्रह्म किंवा परब्रह्म ही सृष्टी बनवणा-या शक्तीचे मूळ अकल्पनिय, अचिंत्य म्हणजे आपल्याला न कळणारे अति सूक्ष्म रूप असून या शक्तीचं साकार आणि खरं भासणारं आभासी रूप म्हणजे माया होय. 'शीवी' किंवा पार्वती ही शिवशंकरांची शक्ती होय. शीवी म्हणजे ती शिवी नव्हे जिथे चुकीची वाकशक्ती, वाणी, घातक किंवा वाईट शब्द असते.

पण हा जर स्त्री शक्तीचाच उत्सव असेल तर प्रत्येक पुरुषात स्त्रियांच्या जन्माला कारणीभूत ठरणारे 'एक्स' गुणसूत्र असल्याने पुरुषांमधल्या स्त्री शक्तीचं नवरात्र हे शुद्धीकरण पर्व असतं असं आपण नक्कीच म्हणू शकतो. आपण जेव्हा जन्म घेतो तो आपण माणूस म्हणूनच का घेतो? हात, पाय, नाक, डोळे, आपल्या सवयी, आवडी निवडी या काहीशा आपल्या आई-वडिलांच्या सारख्याच का असतात? त्यांच्या सारखेच आपण का दिसतो? हे सारं आरेखित केलेलं असतं. आपल्या आई वडिलांच्या शरीरातील पेशींमध्ये गुणसूत्र रूपाने पुरुष बाळ जन्माला येण्यासाठी 'वाय' गुणसूत्र तर स्त्री बाळ जन्माला येण्यासाठी 'एक्स' गुणसूत्र आवश्यक किंवा कारणीभूत असतात. आता पुरुषांच्या शरीरातील पेशींमध्ये 'एक्स' आणि 'वाय' हे दोन्ही गुणसुत्र असतात तर स्त्रीच्या शरीरातील पेशींमध्ये फक्त 'एक्स' गुणसूत्र असतात.

आता दोघांच्या शरीरातील एक एक गुणसूत्र येऊन जोडला जाईल तेव्हा बाळाचं लिंग काय असणार हे ठरणार... पुरुषांमधलं एक्स आणि स्त्री मधलं एक्स एकत्र आलं तर मुलगी जन्माला येणार आणि जर पुरुषांमधलं वाय आणि स्त्री मधलं एक्स गुणसूत्र एकत्र आलं तर मुलगा जन्माला येणार... याचे दोन मुख्य अर्थ होतात. एक म्हणजे मुलगा होणार की मुलगी हे पुरुषामधून एक्स किंवा वाय यापैकी कोणतं गुणसूत्र दिलं जातंय यावर अवलंबून असतं. म्हणजेच दुस-या भाषेत मुलगा होणार की मुलगी याला पूर्णतः पुरुषच जबाबदार असतो आणि स्त्री मध्ये दोन्ही गुणसूत्र एक्स असल्याने ती एक कणखर व्यक्ती असते असं म्हणता येईल. अर्थात स्त्री ही पूर्णपणे स्त्री असते तर पुरुषामध्ये काही प्रमाणात स्त्रीत्व असतं. म्हणजे नवरात्र हा स्त्री शक्तीचा जर जागर असेलच तर तो पुरुषांमधल्या स्त्री शक्तीचा जागर किंवा पुरुषांमधल्या स्त्रीत्वाचं शुद्धीकरण असतं असं आपण म्हणू शकतो.

याही पुढे जायचं झालं तर देवता या वायूरूप असतात. म्हणजे आपण ज्या रूपात त्यांची आराधना करू त्या रूपात त्या आपल्याला प्रसन्न होतात किंवा दर्शन देतात. पण चित्रपटात दाखवल्याप्रमाणे वास्तविकतेत लगेच होतं असं नाही. त्यासाठी स्वत:ला झोकून देऊन उपासना करावी लागते, त्यासाठी जीव ओतावा लागतो. अर्थात अगदी आर्ततेते साद घातल्यावर देवता धावून आली आहे असंही क्वचित प्रसंगी झालेलं आहे.

उदाहरण द्यायचं झालं तर जेव्हा एका हत्तीचा पाय पाण्यातल्या मगरीने पकडला होता, तेव्हा त्या हत्तीने आर्ततेने विष्णूला साद घातल्यावर त्याने धावून येऊन त्या हत्तीची सुटका केली होती. अजामिळ नावाच्या एका नास्तिक व्यक्तीला मोक्ष मिळाला ज्याने आयुष्यभर काहीही उपासना केली नाही. पण मरताना त्याच्या स्वतःच्या मुलाला नारायण म्हणून हाक मारली आणि तो मुक्त झाला. तर सांगायचं उद्देश हाच की देवता जरी माणसा सारख्या दाखवलेल्या असल्या तरी त्या प्रतिकात्मक असतात. त्या जर माणूस असत्या तर त्यांनाही आपल्यासारखे राग, लोभ, द्वेश, प्रेम वगैरे भावना असत्या.

त्यामुळे देवतांमध्ये स्त्री-पुरुष भेद न माजवता, त्याचं अवडंबर न करता स्त्री शक्तीची नव्हे तर केवळ 'शक्तीची पूजा' आपण करतोय हे लक्षात ठेवून उपासना करावी. जिथे शक्ती असेल तिथेच शांती असते.

दुबळ्यांच्या गप्पांना काहीही अर्थ नसतो. तर नवरात्राच्या या काळात देवीची उपासना करून (यात स्त्री-पुरुष सगळे आलेत) आपण शरीराने आणि मनाने शक्ती संपन्न, सामर्थ्यवान व्हायला पाहिजे. आपण शक्तिमान झालो की समाजात आपल्याला मान मिळतो, हाती घेतलेल्या कामात यश मिळतं.

मन आणि शरीर सुद्धा स्वस्थ, शांत राहतं. स्त्रियांनी आणि पुरुषांनी एकमेकांचा, एकमेकातील भेदांचा आदर करत एकत्र काम करायला शिकायला पाहिजे. मन आणि समाजातील वाईट गोष्टींचा नायनाट करण्यासाठी प्रयत्नशील रहायला पाहिजे. उपासना, साधना याचे अनेक अर्थ, प्रकार आहेत. हिंदू धर्म जेवढा प्राचीन आहे तेवढाच विशाल आहे.

**-शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**

# सरसकट पंचनामे करा-पालकमंत्री संजय शिरसाट




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान मोठ्याप्रमाणावर झाले आहे.सर्वच क्षेत्रात शेतकऱ्यांना हा निसर्गाचा कोप सहन करावा लागत आहे. अशाप्रसंगी शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण सर्वांनी उभे राहणे गरजेचे असून सरसकट सर्वच ठिकाणी नुकसानीचे पंचनामे करा, त्यासाठी ड्रोन, मोबाईल फोटो यांचे पुरावे ग्राह्य धरा,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज कन्नड येथे दिले.

कन्नड येथील तहसिलदार कचेरीत आज पालकमंत्री शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत अतिवृष्टीच्या नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानीचा व करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.आ. संजना जाधव, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट तसेच अन्य विभागांचे अधिकारी, सरपंच, ग्रामस्थ, शेतकरी आदी उपस्थित होते.बैठकीच्या प्रारंभी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी झालेल्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल सादर केला. त्यानुसार, तालुक्यात सरासरीच्या १२३ टक्के पर्जन्यमान झाले आहे.८ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे.१०१ गावांमध्ये शेतीचे नुकसान झाले आहे.१९ हजार २६४ हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले आहे.२० जनावरे व ४ माणसे दगावली आहेत.कापूस, मका,भाजीपाला आदीपिकांचे नुकसान झाले आहे. अद्याप अनेक ठिकाणी पाणी साचले असल्यामुळे पंचनामे होऊ शकले नाहीत.पंचनामे झाल्यावर नुकसानीचा प्रत्यक्ष अंदाज येईल.

### कन्नड येथे नैसर्गिक आपत्ती आढावा बैठक

उपस्थित शेतकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी बैठकीत आपले गाऱ्हाणे यावेळी पालकमंत्री शिरसाट यांच्यासमोर मांडले. त्यात प्राधान्याने वन्य प्राण्यांचा उपद्रव,शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ते नसणे,शेताची जमीनच वाहून जाणे, शेतात पाणी तुंबणे इ.समस्यांचा समावेश होता.आ. संजना जाधव म्हणाल्या की, तालुक्यात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन उभे आहे.पंचनामे सगळ्यांचे होतील आणि योग्य ती नुकसान भरपाई मिळेल. शासनाने दिवाळीपुर्वी ही भरपाई द्यावी, अशी मागणीही श्रीमती जाधव यांनी केली.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, अत्यंत संवेदनशीलपण प्रशासन काम करीत आहे. दररोज मंडळ, तलाठी स्तरावर आढावा घेण्यात येत आहे. पंचनामे करण्याची प्रक्रिया होत आहे. त्यात स्थानिक अडचणी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी यंत्रणेला सहकार्य करावे. ही प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पार पाडून शासनाकडून अनुदान प्राप्त होताच मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवता येईल.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनीही होत असलेल्या उपाय योजनांची माहिती दिली.पालकमंत्री शिरसाट यांनी निर्देश दिले की, जिल्हाधिकारी यांनी आपल्यास्तरावरुन मंडळ अधिकारी आणि तलाठी यांचा दररोज सायं. ६ वा. आढावा घ्यावा. शासनाने निर्देश दिल्यानुसार ड्रोन सर्व्हे करा, मोबाईल फोटो व्हिडीओचे पुरावे ग्राह्य धरुन पंचनामे करा. वन विभागानेवन्य प्राण्यांचाशेतीतील शिरकाव थांबविण्यासाठी उपाययोजना राबवाव्या. शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्याबाबतची प्रक्रिया राबवा.



नुकसानीचा अंदाज पाहता सरसकट सगळ्याच शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करा, आणि शेतकऱ्यांना दिलासा द्या. शेतकऱ्यांच्या पाठीशी या संकटसमयी शासन उभे आहे,असेही त्यांनी यावेळी उपस्थितांना सांगितले.याप्रसंगी पुरात मयत झालेल्या संजय दळे या व्यक्तीच्या वारसांना सानुग्रह अनुदानाचा चार लक्ष रुपयांचा धनादेश पालकमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आला.


पालकमंत्र्यांनी केली तालुक्यातील नुकसानीची पाहणी

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी तालुक्यातील करंजखेड, नेवपुर, घाटशेंद्रा, टाकळी अंतूरआदी ठिकाणी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला.

यावेळी त्यांच्या समवेत आ. संजना जाधव, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळील खड्डे बुजवा..अन्यथा उपोषण - जीवन पठारे



**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ प्रतिनिधी/** शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ या महामार्ग वर मुख्य चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोरील मोठमोठे खड्डे पडले आहेत ते स्मारकाच्या अगदी जवळ आहे. यामुळे अनेक आवजड आणि इतर वाहने तिथून जातात, त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे यापूर्वी अनेक अपघात झाले आहेत. तसेच, या खड्ड्यामुळे दगड उडून स्मारक ला लागू शकतो या मुळे सामाजिक आणि धार्मिक तेढ निर्माण होऊ शकतो. म्हणून, येथील खड्ड्यांवर योग्य पद्धतीने लवकर काम करावे अन्यथा २९ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ लोकशाही पद्धतीने उपोषण करण्यात येईल अशा अश्याचे निवेदन कार्यकारी अभियंता छत्रपती संभाजी नगर यांना देण्यात आले आहे या निवेदनावर संविधान युवा मंच चे जीवन पठारे, श्रीकांत जाधव, बाळासाहेब त्रिभुवन, लहानू त्रिभुवन, वाल्मिक त्रिभुवन,अंकुश त्रिभुवन, शरद फुलारे आदी पदाधिकारी च्या स्वक्षऱ्या आहेत.

### खुलताबाद तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा - छत्रपती शंभुराजे ब्रिगेडतर्फे तहसीलदारांना निवेदन



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी/**महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष प्रणित छत्रपती शंभुराजे ब्रिगेडतर्फे खुलताबाद तहसील कार्यालयात गुरुवारी (दि.२५) तहसीलदार स्वरूप कंकाळ यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की खुलताबाद तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेले मोठ्या प्रमाणावरील पिकांचे नुकसान लक्षात घेऊन तातडीने ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली.तसेच शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, पिक विमा तातडीने मंजूर करावा तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत द्यावी. तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली.या प्रसंगी जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र उबाळे पाटील, जिल्हा संघटक रतन जाधव, कामगार सेना माथाडी तालुकाध्यक्ष अमोल गुंजाळ, तालुकाध्यक्ष मुबारक पठाण, तालुकाध्यक्ष रमेश चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष बंडू तांदळे, अण्णा श्रीखंडे, मलंग शेख यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.


### पळसवाडी मध्ये नवरात्र उत्साहामध्ये साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी येथील नवरात्र उत्सवाला एक वेगळेच महत्त्व असते. यावेळी उत्सव काळात बंधुभाव एकात्मता आणि वाढावा,या उद्देशाने देवी ची स्थापना करण्यात आली आहेत.शारदीय नवरात्र महोत्सव २२ तारखे पासून सुरू झाला आणि खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी येथे दर वर्षी प्रमाणे सार्वजनिक सण उत्सव मोठ्या उत्सहात साजरे केले जातात, त्याच प्रमाणे नवरात्र महोत्सवास प्रारंभ झाला. आणी पुर्ण नऊ दिवस नवरात्र उत्साह मध्ये कशा प्रकारे साजरा करता येईल असा पुर्ण पणे नियोजन महिला स्व:ता बघतात पहिल्या दिवशी गावातील सर्व महिलांच्या हस्ते विधिवत पुजा करून घटस्थापना करण्यात आली.दरम्यान सध्या अतिवृष्टीने थैमान घातले असून शेतकन्यानाचे हाता तोंडाशी आलेले सर्व पीक उध्वस्त झाल्याने यातून सावरण्याची आमच्या शेतकरी राजाला शक्ती दे, अशी प्रार्थना मातेच्या चरणी, सर्व नवदुर्गा महिला मंडळ पळसवाडी यांनी केली आहेत. अशा प्रकारे मोठ्या थाटामाटात नवरात्र उत्सव सुरू आहेत.

# जातीअंतानेच होईल सत्यशोधक समाजाची निर्मिती-प्रा. नूतन माळवी



**आत्ताच एक्सप्रेस**

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी/** जातीच्या अस्मिता बळकट होत चालल्यामुळे अन्याय अन्यायाविरोधात एकत्रित येणे बंद चालले होत आहे, शाळा महाविद्यालयांमध्ये जाती नष्ट होण्याऐवजी त्या बळकट होताना दिसत आहेत. सत्यशोधक समाजाच्या निर्मितीकरिता जातीअंत आवश्यक असून जातीच्या पलीकडे जाऊन सकल समाजाच्या उन्नतीसाठी भूमिका घेऊन काम करण्याची गरज असून जातीअंतशिवाय सत्यशोधक समाजाची निर्मिती अशक्य असल्याचे प्रतिपादन सत्यशोधक महिला अभ्यासक प्रा. नूतन माळवी (वर्धा) यांनी केले. त्या सत्यशोधक समाज प्रतिष्ठानतर्फे सत्यशोधक समाज वर्धापन दिनानिमित्त सत्यशोधक समाज आणि आजचे वास्तव या विषयावर (दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी) मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे आयोजित जाहीर व्याख्यान कार्यक्रमातून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी न्यायमूर्ती डी. आर. शेळके (सत्यशोधक समाज कार्यकर्ते) हे होते. विचारमंचावर प्रा. वासुदेव मुलाटे, साथी सुभाष लोमटे, कॉ. भीमराव बनसोड, ड. रमेशभाई खंडागळे, ग. ह. राठोड, विजयभाऊ पाथ्रीकर, त्र्यंबक पाथ्रीकर, बी. के. आदमाने, सुभेदार सुखदेव बन आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. माळवी म्हणाल्या की,एका जातीचा लढा पुढे नेणे हा आरएसएसचा अजेंडा आहे. डॉ. पंजाबराव देशमुख हे सत्यशोधक होते, त्यांनी त्यावेळी आरक्षणासंदर्भात घेतलेली भूमिका स्वीकारली गेली नसल्याने आज आंदोलनाची वेळ आली आहे. महात्मा फुलेंचा आसूड उगारण्यासाठी आणखी किती दिवस वाट पहावी लागेल, याचे आत्मचिंतन फुले आंबेडकरवाद्यांनी करण्याची गरज आहे.

प्रा. वासुदेव मुलाटे बोलताना म्हणाले की, महात्मा फुलेंच्या नावाचा केवळ राजकारणासाठी, खुर्ची वाचविण्यासाठी होतेय त्यांचे विचार पायदळी तुडविण्याचे काम सर्हासपणे सुरू आहे. शिक्षणाचे सुरू केलेले बाजारीकरण व खाजगीकरण हा महात्मा फुलेंच्या विचाराशी द्रोह आहे. ड. डी. आर. शेळके म्हणाले की, फुले - शाहू-आंबेडकर महाराष्ट्राने आजही स्वीकारलेले नाहीत, संविधान बदलण्याची जय्यत तयारी सुरू असून कोणत्याही क्षणी मनुस्मृतीचे पुनरुज्जीवन होण्याची शक्यता आहे, हे थांबविण्यासाठी सर्वांनी सामर्थ्याने विरोध करावा लागेल तेव्हाच ही धर्मांध व्यवस्था उलथून टाकता येईल. प्रास्ताविक सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड. के. ई. हरिदास यांनी केले.

सूत्रसंचालन ड. वैशाली डोळस यांनी केले आभार रतनकुमार साळवे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. भारत शिरसाट, इंजि. चेतन राऊत, अनंत भवरे, इजि. महेश निनाळे, सविता अभ्यंकर, जयप्रकाश हरिदास, अमरदीप वानखडे, जितेंद्र भवरे डॉ. अरुण कांबळे, डॉ. सविता लोंढे, रामदास अभ्यंकर, रमेशचंद्र धनेगावकर, डॉ. अविनाश अंकुशराव, जनार्दन कपूरे, राजन कीर्तने, बाबुराव गवई, प्रभाकर आरसूड, सुनील वायसळ, आदींनी परिश्रम घेतले.

### भागवतामध्ये सांगितलेल्या चांगल्या गोष्टींचा अंगीकार करा - बाळू महाराज गिरगावकर

**आत्ताच एक्सप्रेस /गंगापूर/ प्रतिनिधी**/नवरात्रीमध्ये नउ दिवस कडक उपवास करायचा आणि घरात सासू, सासरे, आई वडिलांकडे दुर्लक्ष करायचे हे बरोबर नाही. त्यामुळे जेव्हा कर्मकांडे तर्काला धरून नसतात आणि केवळ परंपरेमुळे किंवा दिखाव्यासाठी केली जातात, तेव्हा ती करण्याची गरज नसल्याचे प्रतिपादन प्रसिध्द कथाकार भागवताचार्य बाळू महाराज गिरगावकर यांनी येथे बोलताना केले. सार्वजनिक दुर्गामाता उत्सव समितीच्यावतीने येथील जिल्हा परिषदेच्या प्रांगणात सुरू असलेल्या देवी भागवत कथेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोजिका सुवर्णाताई जाधव, माजी नगराध्यक्ष संजय जाधव, ,अशोक पाटील, मुकुंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## लासूर स्टेशन परिसरात लंपी रोगाने काढले डोकेवर जनावरांची लसीकरण करून घ्याव-मा.उपसरपंच गणेश व्यवहारे

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन परिसरातील सध्या सर्वत्र पाळीव जनावरांना लंपी या आजाराचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत आहे, या आजाराला



आवळा घालण्यासाठी लासुर स्टेशन येथे पशुवैद्यकीय दवाखाना डोणगाव, व आ प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली कै. अंबादासभाऊ व्यवहारे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश व्यवहारे यांच्यावतीने लसीकरण मोहीम राबविण्यात आली. दरम्यान समाज माध्यमाद्वारे जनजागृती करून मिळालेल्या माहितीप्रमाणे शेतात जाऊन जनावराचे लसीकरण आणि औषध उपचार करण्यात येत असून शेतकऱ्यांनी ९८६०१३१४०० या क्रमांकावर आपली माहिती द्यावी मिळालेल्या माहितीप्रमाणे पथकासह उपचारासाठी मदत केली जाईल असे आवाहन गणेश व्यवहारे यांनी केले आहे. दरम्यान महाराष्ट्रात लम्पी रोगाचा प्रादुर्भाव नियंत्रणात आहे आणि लसीकरण मोहीम सुरू आहे. तरीही, गावे आणि जिल्ह्यांमध्ये या आजारामुळे जनावरांवर उपचार सुरू आहेत, जसे हा आजार गुरांसाठी घातक असून, शेतकऱ्यांनी जनावरांना संसर्ग टाळण्यासाठी सावधगिरी बाळगावी, असे पशुसंवर्धन विभागाने आवाहन केले आहे.

प्रसंगी डॉ. अनिश, आय गहिरे, पुनमसिंग सुलाने यांनी केले याप्रसंगी गणेश व्यवहारे, बाबासाहेब हाडके,राजू हाडके, बापू थोरात, अरुण हाडके, अमोल लंके, गणेश निकम दिनेश व्यवहारे, बाबासाहेब कहाळे, गणेश लकें, नारायण लकें, सुनिल हाडके भागीनाथ क्षीरसागर, वालमीक बोरसे, गोरख चव्हाण, शिवाजी चव्हाण, भगवान चव्हाण, शरद पवार, गणेश कुकलारे, शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

लसीकरण: हे गुरांना नवीन लस वापरणारे पहिले भारतीय राज्य बनले आहे. उपचार आणि प्रतिबंध: या आजारावर कोणतेही 'जादुई औषध' नाही, परंतु वेळेवर निदान, त्वचेची काळजी, कीटक नियंत्रण आणि लसीकरण याद्वारे उत्तम परिणाम मिळतात. शेती आणि पशुसंवर्धन: शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगणे आणि जनावरांची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. पुढील काय करावे ? त्वरित संपर्क साधा: जर तुमच्या जनावरांमध्ये लम्पीची लक्षणे दिसली, तर ताबडतोब जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधा. लसीकरण: तुमच्या जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले आहे की नाही हे तपासा. स्वच्छता: जनावरांची स्वच्छता राखा आणि आजारी जनावरांना इतरांपासून वेगळे ठेवा.

## गंगापूर महावितरण कंपनीचा कारभार चव्हाट्यावर लाईट बंद असल्याने वीज ग्राहकांची गैरसोय

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर शहरातील समता नगर येथील पठाण डीपीवरील लाईट रोज सकाळी सहा वाजता महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्याकडून बंद करून ठेवण्यात येत असल्यामुळे वीज ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सध्या पावसाळयाचे दिवस सुरू आहे. त्यामुळे मच्छरदासांचे प्रमाण वाढले आहे. रोज सकाळी सहा वाजता लाईट बंद करून ठेवल्यामुळे ग्राहकांची झोप मोडत आहे. लाईट बंद असल्यामुळे मच्छरदास परिसरातील नागरिकांना चावत असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महावितरण कंपनीचे अधिकारी जाणून बुजून या परिसरात रोज सकाळी सहा वाजता लाईट बंद करत असल्याची चर्चा आहे. महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना वीज ग्राहकाकडून फोन करून विचारणा केली असता लाईट का बंद करून ठेवण्यात आली तर महावितरण



कंपनीच्या अधिकाऱ्याकडून बोलले जात आहे की डीपीवर काम चालू आहे फिऊज गेला असेल कर्मचारी पाठवला आहे अशी दिशाभूल करणारी माहिती देऊन वीज ग्राहकांची दिशाभूल केली जात असल्याची चर्चा आहे.

रोज सकाळी सहा वाजता कोणता काम डीपीवर चालू राहत आहे असं प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला आहे. पठाण डीपीवरील लाईट बंद असल्यामुळे या परिसरातील गोरगरीब काही महिलांना शेतात कामासाठी जावं लागते परंतु लाईट बंद असल्यामुळे त्यांना स्वयंपाक घरातील मिक्सर असे काही साहित्य लाईटवर वापरायचे असते परंतु लाईट बंद असल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे.

महावितरण कंपनीकडून या परिसरात लाईट सुरळीत चालणार का? वीज ग्राहकांची गैरसोय थांबणार का? प्रशासन या प्रकरणाकडे काय भूमिका घेणार याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करा या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाधिकाऱ्यां मार्फत पालकमंत्री यांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सततच्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, सरकारने तातडीने जिल्ह्यात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीने जिल्हाधिकारी मार्फत पालकमंत्री यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात शेतकऱ्यांसाठी तातडीने आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे खरीप हंगामातील उभी पिके जमिनीमध्ये पूर्णपणे खराब झाली आहेत. कापणीला आलेल्या पिकांसह भाजीपाला आणि फळबागांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे थेट आर्थिक नुकसान झाले असून, अनेक शेतकरी आधीच कर्जबाजारी असल्याने त्यांच्यावर आत्महत्येचे संकट वाढत आहे.या संकटाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसलेला नाही, तर शेतमजूर, व्यापारी आणि ग्रामीण उद्योगांवरही याचा नकारात्मक परिणाम झाला आहे. त्यामुळे तातडीने ओला दुष्काळ जाहीर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावेळी वंचित बहुजन आघाडीने निवेदनाव्दारे सरकारकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत.

जालना जिल्हा सरसकट ओला दुष्काळ त्वरित जाहीर करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत द्यावी.शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करून कर्ज वसुलीला स्थगिती द्यावी.

शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे.या मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही या वेळी देण्यात आला. या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके, जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर खरात, जिल्हा उपाध्यक्ष सतीश खरात, रामप्रसाद थोरात,चोखाजी सौंदर्य, गोवर्धन जाधव,अंबड तालुकाध्यक्ष किशोर तुपे, मंठा तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, घनसावंगी तालुकाध्यक्ष समाधान तोडके, बाबासाहेब गालफाडे, नानाभाऊ डोळसे,सुभाष आधुडे,दिलीप मगर,नितीन मगर, अविनाश गाडेकर,संघर्ष पंडित, गौतम भालमोडे, गौतम मगर आदीसह स्वाक्षऱ्या आहेत.



# संक्षिप्त

## मंत्री मंगलप्रभात लोढा यांचा आज जालना जिल्हा दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असुन त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीप्रमाणे शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०२५ दुपारी १.५५ वाजता हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे आगमन. दुपारी २.०० वाजता इन्क्युबेशन सेंटरच्या उद्घाटनास मुख्य अतिथी म्हणुन उपस्थिती. दुपारी ३.०० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथील जागेवर झालेल्या अतिक्रमण विषया संदर्भात बैठक दुपारी ३.३० वाजता शॉर्ट टर्म कोर्सबाबत जालना जि.व्य.शि.प्र. विभागाची बैठक.सायंकाळी ४.३० वाजता पुरग्रस्त शेतकऱ्यांची भेट. स्थळ - मु. पो. शेलगाव, ता. बदनापूर, जि. जालना सायंकाळी ५.०० वाजता मु. पो. शेलगाव, ता. बदनापुर जि. जालना येथून छत्रपतीसंभाजीनगरकडे प्रयाण.

## उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचा २६ सप्टेंबर रोजी जालना दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी जालना जिल्हा दौऱ्यावर येत असुन त्यांचा जालना दौरा कार्यक्रम पुढीप्रमाणे सकाळी ११.०० वाजता जालना शहर व ग्रामीण अतिवृष्टीमुळे बाधीत भागाची व औद्योगिक क्षेत्राची पाहणी. दुपारी ४.०० वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण.

## जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसिध्दी जिल्हा स्तर समितीमध्ये जिल्हा समन्वय नेमण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जादुटोणा या क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक महिला, पुरुष यांनी भारतीय समाजात रुजलेल्या काही अनिष्ट, अघोरी, अमानुष आणि संस्कारातुन रुजलेल्या अनेक प्रकारच्या गैरसमजुतीमुळे समाजाचे अतोनात नुकसान होतांना दिसून येत आहे. लाखो माणसांचे जीव वाचविण्यासाठी त्यांचे होणारे शोषण व छळ थांबविण्यासाठी व समाजाचे मानसिक स्वास्थ सुधारण्यासाठी समाज प्रबोधनासोबतच अघोरी, अमानुष, प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत जादुटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसिध्दीचे कार्य करण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत केली असून त्यामध्ये जिल्हा समन्वयक (विना मोबदला) नेमण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे.महिला, पुरुष व्यक्ती यांनी जिल्हा स्तरावर जादूटोणा विरोधी कायदा प्रचार व प्रसिध्दीचे कार्य करण्यासाठी प्रस्ताव सादर करावयाचे आहेत त्यांनी हे प्रस्ताव दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजीपर्यंत आवश्क कागदपत्र तसेच व पोलिस विभागाचे चारीत्र्य प्रमाणपत्रासह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, यांनी कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत प्रस्ताव दाखल करावेत. असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण,राजु एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम अंमलबजावणीसाठी मुदतवाढ बाबत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (नियमाधीन करणे श्रेणीवाद व नियंत्रण) अधिनियम, २०२१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने ३१ डिसेंबर २०२० पुर्वीचे अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमाधीन करण्यास मान्यता दिलेली आहे. जालना जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना जालना यांच्याकडील नोंदणीकृत परवानाधारक आर्किटेक्ट इंजिनियर यांचेमार्फत प्रस्ताव दाखल करणेसाठी दिनांक ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी जालना जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, जालना जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दिनांक ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी दिनांक ३० जुन, २०२६ पुर्वी विहीत कागदपत्रासह प्रस्ताव गुंठेवारी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करावे. तसेच उपरोक्त प्रमाणे मुदतीत प्रस्ताव दाखल केले नसल्यास अशी अनधिकृत विनापरवाना बांधकामे पाडणेची कार्यवाही करण्यात येईल याची सर्व नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन प्राधिकृत अधिकारी (गुंठेवारी कक्ष), तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास म.च्या थकीत कर्ज लाभार्थ्यांना व्याज रकमेत ५० टक्के सवलत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपुर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यात बाबतची एकरक्कमी परतावा (जढड) योजना दि.३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीनी सदर योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे.अधिक माहितीसाठी महामंडळाच्या जालना जिल्हा कार्यालयाशी (दुरध्वनी क्रमांक ०२४८२ -२२३४२०) संबंधितांनी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. एम. राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# श्री आसाराम भांडवलदार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता अभियान

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी**/ गंगापूर कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथील श्री आसारामजी भांडवलदार कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालय परिसरातील गाजर गवत तसेच इतर स्वच्छता करण्यात आली यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेऊन लावलेल्या झाडांची निगा व साफसफाई करण्यात आली दरम्यान स्वच्छता ही सेवा अभियान हा केवळ उपक्रम नसून, यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाने सक्रिय सहभागी होणे आवश्यक आहे. स्वच्छतेतून आरोग्य, पर्यावरण आणि विकासाचा पाया मजबूत होतो. 'स्वच्छतेचा संकल्प' घेऊन शहराला स्वच्छतेचा आदर्श निर्माण करण्यासाठी महाविद्यालय चे विद्यार्थी हे सतत राबवत असते.




या उपक्रमांमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले यांनी याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव ,उपप्राचार्य डॉ. वसंत माळी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. अर्जुन उबाळे प्रो. डॉ. गणेश काथार व इतर प्रा.चतरसिंग तडवी डॉ. संतोष जाधव प्रा. शहा प्रा. अमोल झिने प्रा. शेखनाथ जाधव प्रा. माळी मॅडम रा. से. यो. प्रतिनिधी शेख अरबाज मन्सुरी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर समाजशास्त्र विद्यार्थी मंडळातर्फे पर्यावरणावर व्याख्यान व वृक्षारोपण

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** देवगिरी महाविद्यालयाच्या समाजशास्त्र मंडळाच्या वतीने दि. २४ सप्टेंबर रोजी खाम नदीच्या इको पार्क येथे 'वातावरणीय बदल पर्यावरण आणि समाज' या विषयावर स.भु .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर हे होते तर समाजशास्त्र विभागप्रमुख प्रोफेसर दिलीप खैरनार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

प्रा. सतीश पाटील यांनी आपल्या व्याख्यानात वृक्ष लागवडीचे महत्त्व विशद करताना मानवास निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या परिणामापासून मुक्ती हवी असेल तर अधिकाधिक प्राणवायू निर्माण करणाऱ्या वृक्षांची लागवड व त्याचे संगोपन केले पाहिश्रजे असे नमूद केले. तर प्राचार्य अशोक तेजनकर यांनी वाढत्या उष्णतेपासून बचाव होण्यासाठी वृक्षाचे महत्त्व विशद केले. वृक्षांवर पर्जन्यमान अवलंबून असून मानवी समाजाचे जीवन त्यावर अवलंबून आहे असेही ते पुढे म्हणाले.

तर समाजशास्त्र विभागाच्या विविध उपक्रमाचे आयोजन करताना समाज बांधिलकीची जोपासना कशी करता येईल यावर विशेष लक्ष दिले जाते असे विभागप्रमुखांनी नमूद केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. पी.टी. बाचेवाड यांनी केले. व्याख्यानाच्या कार्यक्रमानंतर समाजशास्त्र मंडळाच्या जवळपास ५० विद्यार्थ्यांनी खाम नदी परिसरात वृक्षारोपण केले व त्याबरोबरच त्यांना लावलेल्या वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारीही घेतली.

सदर कार्यक्रमास स. भु .महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय गायकवाड व देवगिरी महाविद्यालय विभागातील प्रा. सुरज गायकवाड, प्रा. पुष्पराज साबळे यासह संशोधक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांना मदत केली नाही तर मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरु देणार नाही - हर्षवर्धन सपकाळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**

राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टी व ओल्या दुष्काळामुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. मात्र सरकारकडून अजूनही ठोस निर्णय न घेता फक्त पंचनाम्याचे नाटक केले जात आहे. शेतकर्यांच्या मूलभूत मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास मुख्यमंत्री व मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जालन्यात गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी जालन्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलतानी दिला.






सकाळी पैठण व अंबड तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. शेतकर्यांच्या जखमांवर सरकार मीठ चोळण्याचे काम करत आहे. मंत्री आणि उपमुख्यमंत्री शेतकर्यांच्या शेतात फक्त फोटोशेशन करण्यासाठी जातात. पंचनाम्याच्या नाटकाने शेतकर्यांना फसवले जात आहे. जनतेच्या दु:खावर राजकारण करणार्या या सरकारचा निषेध केला पाहिजे.राज्यातील २८८ पैकी तब्बल २४० आमदार सरकारच्या पाठीशी असतानाही शेतकर्यांसाठी ठोस निर्णय घेण्यात अपयशी ठरत आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली. शेतकर्यांच्या पोटावर पाय देणारे सरकार जनतेच्या हिताचे नसल्यांही त्यांनी म्हटलं. राज्यात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकर्यांना कर्जाचा तगादा लावू नये व तत्काळ कर्जमाफी करावी, पंचनामा न करता थेट आर्थिक मदत द्यावी, शेतकर्यांना दसरा होण्यापूर्वी हेक्टरी ५० हजार रुपये द्यावेत, ज्यांची शेती वाहून गेली त्यांना एकरी ५ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, पुढील काळात सरकारनेच शेतकर्यांना माफत बी-बियाणे आणि कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलंय.

राज्यातील ३०० पेक्षा अधिक तालुक्यांमध्ये तिप्पट पाऊस झाला असून शेतकर्यांचे उत्पन्न आणि जमीन मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. तरीदेखील सरकारने ओला दुष्काळ घोषित केलेला नाही. शिवाय पिकविमा योजनेतील घोटाळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या सरकारला जबाबदार धरले. पिकविम्याच्या नावाखाली शेतकर्यांची फसवणूक झाली असून आजही अनेक शेतकर्यांना विम्याची रक्कम मिळालेली नाही, असा दावा त्यांनी केला.याप्रसंगी खा.डॉ. कल्याण काळे,जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शहराध्यक्ष अतिक खान,राजेंद्र राख,कल्याण दळे, सर्व तालुकाध्यक्ष व मान्यवर उपस्थित होते.

# लोकशाही दिनाचे दि. ६ ऑक्टोबर रोजी आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्ह्यात दि. ६ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी सकाळी ठिक १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचीत करण्यात येत आहे. कोणत्याही स्तरावर लोकशाही दिनात खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणर नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तसलिदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदती व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http:jalna.mic.in या संकेस्थळावर उपलब्ध आहे.

# डाक विभागात तात्पुरत्या आणि कमिशन तत्वावर ग्रामीण डाक जीवन विमा एजंटसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर डाक विभागातील कन्नड, गंगापूर, खुलताबाद, वैजापूर, पैठण, फुलंब्री, सिल्लोड, अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफ्राबाद आणि सोयगाव या तालुक्यांमध्ये एकुण ५० जागांसाठी ग्रामीण डाक जीवन विमा एजंट नेमणे आहे. त्यासाठी आवश्यक पात्रता पुढीलप्रमाणे असणार आहे. याकरीता वयोमर्यादा १८ ते ६० वर्ष, शैक्षणिक पात्रता ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावातील रहिवासी असल्यास किमान १० वी पास, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावातील रहिवासी असल्यास किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे. इच्छुक उमेद्वारांनी प्रवर अधीक्षक, डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१ यांच्या कार्यालयात जन्म तारीख व शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्यासाठी लागणारे मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांची एक साक्षांकीत प्रत व दोन पासपोर्ट आकाराच्या छायाचित्रासह दि. ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत प्रवर अधीक्षक, डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१ यांच्याकडे सादर करावेत.

# जिल्हाधिकारी कार्यालयात पंडीत दिनलयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी कार्यालयात आज पंडीत दिनदयाळ उपयाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी पंडीत दिनदयाळ उपयाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, नायब तहसिलदार तुषार निकम, सतीष तायडे, दिपाली राऊत, सहायक महसूल अधिकारी सविता पेरके, अतुल केदार, विठ्ठल बोरकर, मीनाक्षी देवशी, अर्जुन चौधरी, सविता भोकरे, वैशाली दिघुळे आदींची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813